Date : / /
Page No.:

## आई-बाबा गीत.

असोत मूर्ती भगवंताच्या भव्य किती मंदिरी
माय-तात हे दैवत माझे वसती माझ्या घरी... ॥धृ॥

प्रेम असे आईचे केवळ खोल समुद्रापरी
"माझी आई" म्हणू शके जो धन्यच भूमीवरी
व्याकुळ होऊनि देवही जन्मे आईच्या उदरी
माय-तात हे दैवत माझे... ॥१॥

छत्र पित्याचे जणू संरक्षक एकमेव जगती
असता माझे बाबा मजसी नाही कुणाची भीती
जीवनभर उपकार तयांचे कृतज्ञतेने स्मरी
माय-तात हे दैवत माझे ... ॥२॥

... मोहन बेदरकर.



